# "महात्मा गांधीजींच्या सत्याग्रही विचारधाराची सद्यकालीन प्रस्तुतता"

**डॉ. एस ए मोरे,** सहयोगी प्राध्यापक, म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा, जिल्हा कोल्हापूर.

---

**सारांश**

भारतातील नव्हे तर संपूर्ण जगातील एक असामान्य नेतृत्व म्हणून महात्मा गांधींना ओळखल जात. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानात नैतिकता व अध्यात्मिकता आढळून येते.त्यांना आपल्या संपूर्ण जीवनकार्यातून विशेषता सत्याग्रही विचारातून रामराज्य आणावयाचे होते. हे रामराज्य त्यांना फक्त भारतातच आणायचे होते असे नाही तर ते त्यांना संपूर्ण विश्वामध्ये आणावयाचे होते. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील आणि भारतातील सत्याग्रही विचाराच्या माध्यमातून फार मोठे परिवर्तन घडवून आणले आहे .आज जगाला खऱ्या अर्थाने महात्मा गांधीजींच्या शांततेच्या, अहिंसेच्या, प्रेमाच्या व सत्याग्रही विचाराची गरज आहे. आज आपण विज्ञान आणि संगणकीय महाजालाच्या युगामध्ये वावरत आहोत. विज्ञानाच्या अतिरेकी वापराने आपण विवेक हरवत चाललो आहोत हा विवेक आम्हाला गांधीनी शिकविला आहे. सदर शोध प्रबंधात महात्मा गांधी यांच्या सत्याग्रही विचारधारांची सद्यकालीन प्रस्तुतला मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना:**

विसाव्या शतकातील भारतातील नव्हे तर संपूर्ण जगातील एक असामान्य नेतृत्व म्हणजे महात्मा गांधी होय .गांधीजी हे फक्त भारतीय स्वातंत्र्यलढा किंवा सत्य आणि अहिंसा एवढ्या पुरतेच मर्यादित नव्हते तर ते बहुआयामी व्यक्तिमत्व होते. ते राजकारणी, शिक्षणतज्ञ,वकील, निसर्गभक्त व पर्यावरणवादी ही होते.ते शिकून बॅरिस्टर झाले व आफ्रिकेत गेले. तेथे त्यांनी सत्याग्रहाच्या माध्यमातून वंश भेदाविरुद्ध लढून फार मोठे यश प्राप्त केले. भारतात आल्यानंतरही त्यांनी सत्याग्रहाच्या माध्यमातून ब्रिटिश सरकारला नामोहरण करण्याचा प्रयत्न केला. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर निर्माण झालेली पोकळी त्यांनी आपल्या नेतृत्वाच्या माध्यमातून भरून काढली व भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. आजही त्यांच्या विचारांची आपल्या देशाला आणि जगाला गरज आहे म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधात म. गांधीजींच्या सत्याग्रही विचाराच्या माध्यमातून त्यांच्या सत्याग्रही विचारांचाआढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषयाचे महत्त्व:**

आज जगाला खऱ्या अर्थाने महात्मा गांधी यांच्या शांततेच्या, अहिंसेच्या, प्रेमाच्या व सत्याग्रही विचारांची गरज आहे.त्यांच्या चरित्राचे,चारित्र्याचे,नीतिमत्तेचे, त्यांच्या उक्ती कृतीचे, तत्वविचारांचे, त्यांनी सांगितलेल्या जीवन मूल्याचे केवळ स्मरण करून भागणार नाही तर त्यांचे मनन, चिंतन करून त्याचे अनुकरण, अनुसरण करण्याची नितांत गरज आहे. बोध घेणे गरजेचे आहे. आज विज्ञान तंत्रज्ञान संगणकीय महाजालाचे युग आहे. हे सारे श्रेष्ठ आहे आणि गरजेचेही आहे.मात्र अतिवापराने आपण विवेक हरवत चाललो आहोत हा विवेक आम्हाला गांधींनी शिकविला आहे. आजही गांधीजींच्या सत्याग्रही माध्यमातून, विचारातून एक आदर्श समाज आदर्श राष्ट्र निर्माण करू शकतो.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१)म.गांधीजींची सत्याग्रही विचारधारा समजून घेणे.

२) म. गांधीजींच्या सत्याग्रही विचारधारेतून देशात नवचैतन्य कसे निर्माण झाले समजून घेणे.

३)म.गांधीजींच्या भारतातील सत्याग्रहाच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याचा आढावा घेणे.

४)म.गांधीजींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाची वास्तवता समजून घेणे.

५)म.गांधीच्या सत्याग्रही विचारधारेच्या माध्यमातून अन्यायी सरकार विरुद्ध लढण्याची सामान्य माणसात ऊर्जा कशी निर्माण झाली याचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:**

महात्मा गांधींच्या सत्याग्रही विचारधारांचे सध्य कालीन प्रस्तुतता समजून घेण्यासाठी मी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या संदर्भ साधनांचा वापर केला आहे.

**सत्याग्रहाचा अर्थ:**

सत्याग्रह शब्दाची उत्पत्ती होण्यापूर्वी सत्याग्रह शब्दासाठी महात्मा गांधींनी इंडियन ओपिनियनमध्ये वाचकांसाठी स्पर्धा ठरविली त्यामधून मदनलाल गांधींनी सत आग्रह याची संधी करून सदाग्रह असा शब्द पाठविला त्या स बक्षीस मिळाले. परंतु महात्मा गांधींनी त्यात बदल करून सत्याग्रह असा शब्द बनविला.[१] गांधींच्या राजकीय विचारात सत्याग्रहाला सर्वश्रेष्ठ स्थान आहे सत्याग्रह हा अहिंसात्मक पद्धतीने युद्ध करण्याचा मार्ग आहे. सत्याग्रह या शब्दाचा अर्थच मुळी सत्याचा आग्रह असा आहे. सत्याग्रहा द्वारे दुसऱ्याचे हृदय परिवर्तन घडवून आणणे म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह म्हणजे अन्याय, दडपशाही आणि शोषण विरुद्ध केलेला आत्मशक्तीचा वापर होय. गांधीजींच्या मते हिंसे शिवाय लढाई करता येते जिंकता येते हे सिद्ध करणे. अत्याचार करणाऱ्या पुढे मान वाकवुन नाही पण त्याची मान ही छाटणार नाही असा निर्धार सत्याग्रहात केला जातो. गांधीजींनी हा सत्याग्रहाचा मार्ग सर्वसामान्याना मोकळा करून दिला यातच गांधीजींच्या कार्याची थोरवी समजून येते.[२]

म.गांधीजींनी सत्याग्रहाचा अधिकार आणि त्याचे महत्त्व यासंबंधी पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. सत्याग्रह मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क,पवित्र अधिकार व पवित्र कर्तव्य सुद्धा आहे. जर सरकार विश्वासघातकी अन्यायी लोकांना पाठिंबा देत असेल तर सरकारच्या आज्ञा नाकारण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे. म्हणजेच सर्व प्रकारचे कष्ट सहन करण्याची सत्याग्रहीची तयारी असली पाहिजे. आत्मबलिदान करावे लागले तरी त्याच्या मनाची तयारी असली पाहिजे. सत्याग्रहाने अंतिम विजय प्राप्त होतोच. यदाकदाचित मृत्यू झाला तर त्याच्या विजयाचे धोतक ठरते आणि त्याच्या मृत्यूनंतर हजारो लोक त्याच्या मार्गाचा स्वीकार करतात. सत्याग्रह करणाऱ्याची ईश्वरावर श्रद्धा असावी. विरोधकाकडून त्रास सहन करण्याची क्षमता असावी. ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांने सत्याग्रह करावा. सत्याग्रहीला संपत्ती व प्रसिद्धीचे अभिलाषा नसावी. ब्रह्मचर्याचे पालन करावे व स्वार्थासाठी सत्याग्रही मार्गाचा अवलंबून नसावा अशी गांधींनी सत्याग्रहीची पात्रता सांगितली होती.[३]

**दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचे यश:**

दक्षिण आफ्रिकेत हिंदी लोक व कृष्णवर्णीय लोकांच्या वर अनेक बंधने होती .त्यांना मताधिकार नव्हता, ओळखपत्र जवळ बाळगणे, गुन्हेगाराप्रमाणे बोटाचे ठसे घेणे, हिंदी लोकांना पोल टॅक्स द्यावा लागे यावरून गांधीजीने सत्याग्रहाच्या मार्गाने हा लढा दिला. ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न झाला परंतु गांधीजींनी सत्याग्रहाचा मार्ग सोडला नाही.त्यामुळे गांधीजींच्या चळवळीस यश प्राप्त झाले व दक्षिण आफ्रिकन सरकारने पोल टॅक्स ,ओळखपत्र, विवाह वैधता कायदा रद्द इ. मागण्या मान्य झाल्या गांधीजींच्या सत्याग्रहाला मिळालेला हा पहिला मोठा विजय होता.[४]

**भारतातील १९१५ ते १९२० मधील सत्याग्रहाचे यश:**

सन १९१५ च्या जानेवारीत महात्मा गांधी हिंदुस्थानात आले त्यावेळी हिंदी राजकारणात ना. गोखले व लो.टिळक यांचे दोन पक्ष होते शिवाय एक सशस्त्र क्रांतिकारक पक्ष होता.गोखल्यांचे सनदशीर राजकारण, लोकमान्यांचा बहिष्कार योग आणि सशस्त्र क्रांतिकारकांचा गुप्त मार्ग असे स्वातंत्र्यलढ्याचे प्रवाह सुरू होते. अशावेळी महात्मा गांधी सत्याग्रहाच्या शस्त्राने दक्षिण आफ्रिकेत यश संपादून हिंदुस्थानात एक यशस्वी नेता म्हणून आलेले होते म्हणूनच म.गांधीविषयी लो. टिळकांनी म्हटल्याप्रमाणे महात्मा गांधींचा सत्याग्रहाचा मार्ग हा राजकर्त्यांच्या दृष्टीने एक प्रकारे शास्त्रपूत झालेला होता.[५]

महात्मा गांधींनी १९०९ सालीच राष्ट्रसभेला एक संदेश पाठविला होता त्या संदेशात त्यांनी लिहिले होते, हिंदुस्थानच्या सर्व आपत्तीचे निवारण करण्याचा रामबाण उपाय म्हणजे सत्याग्रह हाच होय आणि हे साधन आधुनिक भौतिक सुधारणेमुळे विनाशाकडे धावत जाणाऱ्या मानवतेच्या उद्धारासाठी उपयोगी पडेल असे त्यांनी लिहिले होते.[६]

सत्याग्रहाच्या श्रेष्ठते संबंधित भावना व्यक्त करताना लो. टिळक म्हणतात ,हा मार्ग सर्वप्रसंगी सर्वकाली अवलंबिनासारखा असला तरी प्रत्येक प्रसंगी उपयोगात आणावा की नाही सर्वप्रसंगी तितकाच फलदरूप होईल किंवा नाही हे निश्चयाने सांगणे कठीण आहे. तथापि त्या मार्गाची योग्यता मोठी आहे हे सर्वास कबूल करावे लागेल.[७] एकूणच १९१५ते १९२०सालापर्यंत महात्मा गांधी व त्यांचा सत्याग्रह मार्ग याच्याकडे हिंदुस्तानातील मोठ-मोठे पुढारी आदराने पाहत होते.

**महात्मा गांधींचे भारतातील सुरुवातीचे सत्याग्रहातील यश:**

भारतातील सत्याग्रहाची सुरुवात म. गांधींनी फिजी बेटात जाणाऱ्या मुदत बंदीच्या मजुरांच्या प्रश्नाकडे लक्ष देऊन केले. लॉर्ड हार्डिंगने पुणे कायदेमंडळात याबाबत ठराव झाला असताना देखील ही पद्धत आणखी पाच वर्षे सुरू राहील असे सांगितले.त्यामुळे गांधीजींनी या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधले व ३१ मे १९१७ पूर्वी ही पद्धत बंद करण्यात आली नाही तर तिच्याविरुद्ध सत्याग्रहाची मोहीम सुरू करू असे जाहीर केले.त्यामुळे लॉर्ड चेम्सफर्डने 'डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट खाली ही चळवळ बंद केल्याचे जाहीर केले.[८] त्यामुळे महात्मा गांधींच्या सत्याग्रही चळवळीला मिळालेला विजय लोकांचे लक्ष वेधण्यास पुरेसा झाला.

१९१७ साली एप्रिल महिन्यात चंपारण्यातील मोतीहारी या गावी शेतकऱ्यांच्या अन्यायाची चौकशी करण्यासाठी महात्मा गांधीजी गेले. गांधीजींनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सत्याग्रहाच्या मार्गाने शिक्षा भोगण्यास तयार असल्याचे सांगितले परिणामी सरकारने हा खटला काढून टाकून म. गांधींना शेतकऱ्यांची सेवा व परिस्थितीचे निरीक्षण करण्याची परवानगी दिली. पुढे सरकारने कमिशन नेमून व त्यात गांधींची नेमणूक करून एक कायदा केला.[९] एकूणच गांधीजींच्या सत्याग्रही प्रयत्नामुळेच शेतकऱ्यांची जी गारानी शंभर वर्षेपर्यंत सुटली नसती ती गांधीजींच्या सत्याग्रही विचाराने व लोक सेवेच्या धोरणाने दूर झाली.

1918 मध्ये गांधींचे खेडा दुष्काळाकडे लक्ष गेले. लोकांची पिके बुडाली असताना दुष्काळी कायद्याप्रमाणे सूट मिळणे आवश्यक असताना अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे सारा वसुलीत जुलम होत होता. तेव्हा गांधींनी साराबंदी विरुद्ध चळवळ सुरू केली आणि लवकरच त्यात त्यांना यश मिळाले.त्यामुळे महात्मा गांधी आपणाला न्याय मिळवून देणारी एक शक्ती आहे असा प्रत्येय शेतकरी वर्गाशी येऊ लागला. गांधींनी सत्याग्रहाचे जे यशस्वी प्रयोग केले यावरून हिंदुस्थानच्या भूमीत रुजणारे आणि यशस्वी होणारे असे हे लोकांच्या आत्मउद्धाराचे साधन आहे असा विश्वास सुशिक्षित लोकांमध्ये वाढू लागला. गांधीजींनी भारतात वरील ठिकाणी सत्याग्रहाचे प्रयोग केले व त्यात चांगले यश मिळाले त्यामुळे सत्याग्रह हे अन्याया विरुद्ध लढण्याचे एक साधन म्हणून त्याची उपयुक्तता सिद्ध झाली . गांधीजींचे तत्वही प्रभावी ठरले व सर्वमान्य झाले.[१०]

महात्मा गांधींचे स्वराज्याची प्राप्ती जनतेच्या सत्याग्रहातूनच होणार आहे अशी श्रद्धा होती. सत्याग्रहाचे बळ पाठीशी असल्याखेरीस स्वराज्याची शिष्टाई करण्यापासून फायदा होऊ शकत नाही असे त्यांचे मत होते .म्हणून ज्यावेळी इंग्लंडात स्वराज्याची शिष्टाई करण्यासाठी राष्ट्रसभेचे शिष्टमंडळ गेले होते त्यावेळी त्याबरोबर न जाता हिंदुस्थानात सत्याग्रहाची पेरणी करण्याचे कार्य ते आपल्या तत्त्वास व श्रद्धेस अनुसरून करत होते.[११]

**भारतातील पहिला अखिल भारतीय सत्याग्रह:**

१९१९ मध्ये महात्मा गांधींनी रौलेट कायदाविरुद्ध अखिल भारतीय सत्याग्रहाची पहिली मोहीम जाहीर केली. स्वामी श्रद्धांजली यांनी गुरख्यांच्या संगिनी समोर छाती रोखून भोसकण्याचे आव्हान केले आणि स्वामीजींचा हा सत्याग्रह यशस्वी झाला. गुरख्यांच्या अंतकरणातील सत्यरुपी परमेश्वर जागृत झाला या सत्याग्रहाच्या माध्यमातून प्रत्येक मनुष्याच्या अंतकरणात सत्यरुपी परमेश्वर वास करीत असतो व तो अनासक्त बुद्धीने वाहिलेल्या आत्माहूतीने प्रकट होऊ शकतो हे सत्याग्रहाचे अधिष्ठान यावेळी सामान्य जनतेच्या प्रत्ययास आले व महात्मा गांधी यांच्या सत्याग्रही सिद्धांतावर भारतीय मनुष्यांचा विश्वास अधिक दृढ झाला.[१२]

सत्याग्रह विचाराच्या माध्यमातून म. गांधींनी भारतीय स्वतंत्र चळवळीत फार मोठी ऊर्जा निर्माण केली होती. लोकांच्या उत्साह निर्माण केला होता. म्हणून म. गांधींच्या या सत्याग्रह संबंधी लो.टिळकांची विलायतेतून परत आल्यानंतर त्यांच्या स्वागतासाठी मुंबईत भरलेल्या पहिल्या सभेत पुढील उद्गार काढले, हिंदुस्तानला मिळणारे

स्वराज्य विलायतेतील शिष्टमंडळातून मिळणार नसून या देशातील सत्याग्रहसंग्रामा सारख्या प्रचंड चळवळीतूनच मिळणार आहे[१३].एकूणच टिळकांना देखील सत्याग्रही विचारधाराचे महत्त्व पटल्याचे दिसून येते.

**सत्याग्रहाची प्रस्तुतता:**

70 वर्षे होऊन गेले महात्मा गांधींच्या अस्तित्वा शिवाय भारत जगतो आहे .भारताचे प्रतिनिधित्व करणारे लोक भारत बुद्धाची भूमी आहे, महात्मा गांधींचा देश आहे असे सांगतात जागतिक स्तरावर सर्वाधिक मान मिळवणारी व्यक्ती म्हणजे महात्मा गांधी होय. परंतु आज देशात भ्रष्टाचार शिष्टाचार बनतोय हे संताप जनक आहे. सामान्य माणूस आज भ्रष्टाचाराच्या चरकात पिळला जातोय. श्रमाशिवाय भाकरी म्हणजे चोरी असे सांगणाऱ्या गांधीवादाची गरज आहे. नेतृत्वाने कमीत कमी आराम व जास्तीत जास्त जनसेवा करावी हा गांधींचा आग्रह होता परंतु आजचे नेतृत्व कमीत कमी जनसेवा व जास्तीत जास्त आर्थिक मेवा जमवण्यात मग्न आहे. आज सत्याग्रही विचाराची आणि कृतीची देशाला गरज आहे.

२० व्या शतकात म. गांधींनी सत्याग्रहाची संकल्पना समग्र स्वरूपात मांडून जगाला एक अमोल देणगी दिली आहे. सत्याग्रह हे समस्या सोडवण्याचे अत्यंत सुलभ व प्रभावी तंत्र आहे. सत्याग्रहाचे आजचे विकृत रूप टाळण्यासाठी व त्याचप्रमाणे समाजाच्या समस्या नीटपणे सोडवण्यासाठी गांधी यांच्या सत्याग्रह विषयाचा दृष्टिकोन नीटपणे समजावून घेणे व सत्याग्रही विचाराचा वापर करणाऱ्या कार्यकर्त्याची फळी निर्माण करणे आज नितांत आवश्यक आहे. गांधी सिद्धांताचे महत्त्व सांगताना ,आईन्स्टाईन यांनी म्हटले आहे की आणखी काही वर्षांनी या भूतलावर गांधी नावाचा हाडामासांचा माणूस झाला होता यावर लोकांचं विश्वास बसणार नाही यापेक्षा गांधींचे मोठेपण समर्थपणे आणखी कोणत्या शब्दात सांगता येईल.[१४]

**निष्कर्ष:**

सत्याग्रह ही महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानातील एक प्रमुख महत्त्वाची संकल्पना आहे.भारत ब्रिटिशांच्या साम्राज्यातून स्वतंत्र झाला व स्वतंत्र भारतात लोकशाही टिकली याचे श्रेय महात्मा गांधींच्या सत्याग्रही संकल्पनेच द्यावे लागेल. सत्याग्रहामुळे देशात नवचैतन्य निर्माण झाले समाजाच्या स्थितीबद्दल उदाशीन राहणारे लोक शासनाला किंवा कोणत्याही बलाढ्य शक्तीला शस्त्रबळाशिवाय आपण नमूवू शकतो असा त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.सत्याग्रहाच्या रुपाने महात्मा गांधींनी एकीकडे युद्धाला व हिंसाचाराला पर्याय दिला तर दुसरीकडे भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील शोषित, पीडित, परतंत्र, दुःखी,दुर्बल माणसाच्या हातात अन्यायाच्या विरोधी लढण्याचे धारदार शस्त्र दिले. लोकांचा सार्वजनिक क्षेत्रातील सहभाग वाढला व त्यांचे मनो धैर्य वाढले.

**संदर्भ:**

१) गांधी मो. क.सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद. १९९४.पा. ३०४.

२) Mazhar Kibriya.Ghandi and Indian Freedom Struggle, p 12 to 15.

३) गांधी मो. क. हिंद स्वराज्य,नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद. २०१६.पा.७५

४) Nanda S. P. History of Modern India, p. 380

५) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा.खंड पहिला, राजहंस प्रकाशन,पुणे.२००७ पा. ३६१.

६) आचार्य जावडेकर श. द,आधुनिक भारत. कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे.१९९४.पा.३६१

७) लोकमान्य टिळक यांचे चरित्र, खंड तिसरा .भाग चौथा. पा. ५२.

८) आचार्य जावडेकर श. द. उपरोक्त पा.३६७.

९) Sarkar Sumit Modern India(1885 to 1947) Macmillan publication 1983 p. 185.

१०) कदम य. ना. समग्र भारताचा इतिहास, पा.४३९.

११) आचार्य जावडेकर श. द. आधुनिक भारत,कॉन्टिनेन्टल प्रकाशन ,पुणे.१९९४ पा. ३७०

१२) उपरोक्त पा.३७१.

१३) उपरोक्त पा.३७२

१४) फडणवीस जगन, महात्म्याची अखेर. मेहता पब्लिशिंग हाऊस ,पुणे.१९९४.पा.१२३